# निकोप क्रीडा स्पर्धा धोक्यात

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक



एआय इमेज

**प्रत्येक क्रीडा** स्पर्धेचे स्वत:चे असे नियम ठरलेले असतात. त्या सर्व नियमांची कल्पना खेळाडूंना आधीच दिली जाते. जे खेळाडू हे नियम पाळत नाहीत, त्यांना स्पर्धेतून बाद करण्यात येते. सर्व खेळाडूंना एक समान संधी मिळावी, या हेतून हे नियम तयार करण्यात आलेले असतात. वय, वजन, लिंग, शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीनुसार वेगवेगळे गट तयार करून एका समान पातळीवर स्पर्धेचे आयोजन केले जाते. केवळ, अंगभूत कौशल्यासहितच खेळाडूंनी एकमेकांसोबत निकोप स्पर्धा करावी, यामध्ये अशा कोणत्याही बाह्य गोष्टींचा हस्तक्षेप नसावा, असा दृष्टिकोन ठेवूनच सर्व स्पर्धा आतापर्यंत भरविण्यात येत होत्या. म्हणूनच, जे खेळाडू उत्तेजक घेऊन (क्षमता वाढविण्याचे ड्रग्स/औषध) उतरतात, त्यांच्याविरुद्ध अत्यंत कडक कारवाई केली जाते. निकोप स्पर्धेच्या तत्त्वामध्ये उत्तेजकांचा मोठा अडसर असल्यामुळे  जागतिक उत्तेजक द्रव्य विरोधी संघटना (वाडा) डोळ्यांमध्ये तेल घालून उत्तेजकविरोधी मोहिम सातत्याने राबवित असते. सर्वच क्षेत्रांत सध्या टोकाची स्पर्धा अनुभवण्यास येत असल्यामुळे अशावेळी क्रीडाक्षेत्र तरी कसे मागे राहिल? उत्तेजकविरोधी भूमिका घेऊनच आतापर्यंतच्या सर्व जागतिक स्पर्धा भरविल्या गेल्या. त्याच्या मुळावर आघात करणारी नवीन जागतिक स्पर्धा भरविण्याची अमेरिकेत सध्या तयारी सुरू आहे.

जगातील आघाडीचे शंभर जलतरणपटू, धावपटू आणि वेटलिफ्टर्स या नव्या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे ठरवले आहे. आतापर्यंत ऑलिम्पिकमध्ये जे विश्वविक्रम झाले आहेत. ते सर्व पुसून काढण्याच्या उद्देशाने आणि नवे विश्वविक्रम प्रस्थापित करण्याच्या इराद्याने या खेळाडूंनी सराव सुरू केला आहे. 'एनहान्स गेम्स' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या स्पर्धांमधल्या खेळाडूंना चक्क उत्तेजकं घेण्याची परवानगी मिळणार आहे. म्हणूनच, या स्पर्धकांकडून जुने विश्वविक्रम मोडणे अपेक्षित आहे आणि त्याबदल्यात कोणी कल्पना करणार नाही, अशी भलीमोठी बक्षिस रक्कम या खेळाडूंना मिळणार आहे. सध्या पैशाला अतोनात महत्त्व प्राप्त झाल्यामुळे बऱ्याच विश्वविक्रमी खेळाडूंनी स्वत:चे आरोग्य आणि प्रतिष्ठा धोक्यात घालून या नव्या स्पर्धेत खेळण्यासाठी सराव सुरू केला आहे. पुढील वर्षी मे महिन्यात लास वेगास येथे सुरू होणाऱ्या या स्पर्धेमागे जगातील धनाढ्य व्यक्ती प्रायोजक म्हणून उभे राहिले आहेत.

## अशा यशाला काय किंमत?

**१** 'एनहान्स गेम्स' अशा प्रकारच्या या नव्या स्पर्धांच्या विरोधी वातावरणसुद्धा तापायला सुरूवात झाले आहे. 'वाडा'ने सुद्धा या स्पर्धा बेजबाबदार आणि प्राणघातक असल्याचे म्हटले आहे. जर का तुम्हाला निकोप क्रीडा स्पर्धा नेस्तनाबूत करायची असेल, तर 'एनहान्स गेम्स' ही चांगली कल्पना आहे, असा उपरोधिक टोला आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) लगावला आहे.

**२** 'आयओसी'च्या या टीकेला प्रत्युत्तर देताना, 'एनहान्स गेम्स'च्या प्रायोजकांनी ऑलोम्पिकच्या ब्रीदवाक्याचा सहारा घेतला. 'अतिजलद, अतिबलवान, अतिउंच' हे जर ऑलिम्पिक चळवळीचे ध्येय असेल, तर 'एनहान्स गेम्स'तर्फे आम्ही सुद्धा या उद्दिष्टांशी समर्पित राहून नवे विश्वविक्रम घडवणार आणि त्यासाठी वैद्यकिय शोधांचा उपयोग केला, तर त्यात चुकीचे काय आहे? असा प्रतिप्रश्न 'एनहान्स गेम्स'च्या वतीने करण्यात येतो आहे.

**३** शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी उत्तेजकं घेऊन जर का क्रीडा स्पर्धा भरविल्या, तर त्याचे रूपांतर पूर्वीच्या काळी रोमन सर्कसप्रमाणे होण्याची भीती वैद्यकिय क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे. उत्तेजक विरोधी जनमत एकवटत असताना 'एनहान्स गेम्स' ठरल्याप्रमाणे पुढील वर्षी अमेरिकेत होणारच, याविषयी आयोजक निश्चित आहेत. कारण, 'एनहान्स गेम्स'च्या प्रमुख प्रायोजकांमधील एक जण राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे चिरंजीव आहेत.

**४** अशा पद्धतीने क्रीडा स्पर्धा होणार असतील व त्यातून बक्कळ पैसा मिळणार असेल, तर खेळाडूंचीही पसंती या स्पर्धांना मिळत राहील. मात्र, यामुळे खिलाडूवृत्ती टिकेल का, का प्रश्न आहे. विक्रम हे मोडण्यासाठीच असतात, पण हे विक्रम प्रामाणिकपणे मोडले, तरंच त्या यशाला किंमत आहे.